# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः08.04.2025** **वारःमंगळवार**

---

१. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज लिस्बन इथं पोर्तुगालमधील भारतीय समुदायाला संबोधित करणार

२. प्रधानमंत्री मुद्रा योजनेला दहा वर्ष पूर्ण; आतापर्यंत ३२ लाख कोटी रुपयांची कर्ज वितरित

३. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी विविध देशांमधून होणाऱ्या आयातीवर लादलेल्या कर आकारणीवर चीन रशियाकडून टीका

४. मुंबईवरील दहशतवादी हल्ल्यातील आरोपी तहव्वूर राणाला भारताकडे सुपूर्द करण्याचा मार्ग मोकळा आणि

५. आयपीएल क्रिकेट स्पर्धेत रॉयल चॅलेंजर्स बेंगलोर संघाचा मुंबई इंडियन्सवर १२ धावांनी विजय

<u>राष्ट्रपती</u>

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू सध्या परदेश दौऱ्यावर आहेत. या दौऱ्याच्या पहिल्या टप्प्यात त्या काल पोर्तुगालमध्ये लिस्बन इथं पोहोचल्या. तिथं राष्ट्रपतींनी त्यांचे पोर्तुगालचे समपदस्थ मार्सेलो रेबेलो डीसूझा यांच्याशी शिष्टमंडळ स्तरीय चर्चा केली. या बैठकीत दोन्ही देशांनी व्यापार क्षेत्रातील परस्पर सहकार्य वाढवणं आणि आर्थिक संबंध आणखी बळकट करण्यावर सहमती व्यक्त केल्याचं दोन्ही देशांच्या संयुक्त निवेदनात म्हटलं आहे. यानंतर झालेल्या पत्रकार परिषदेत राष्ट्रपती मुर्मू यांनी, भारत-पोर्तुगाल यांच्यात ऐतिहासिक संबंध असून ते सातत्यानं विकसित होत गेल्यानं त्यांना आता आधुनिक आणि बहुआयामी भागीदारीचं स्वरुप प्राप्त झाल्याचं सांगितलं. भारत-पोर्तुगाल राजनयिक संबंधांना ५० वर्ष पूर्ण होत असल्यानिमित्त काढण्यात आलेल्या विशेष टपाल तिकिटाचं राष्ट्रपती मुर्मू आणि अध्यक्ष रेबेलो डीसूझा यांच्या उपस्थितीत प्रकाशन करण्यात आलं. या तिकिटावर राजस्थानची खास ओळख असलेला कालबेलिया हा पारंपरिक पोषाख तसंच पोर्तुगालच्या वियाना दो कास्टेलो पोषाखाचं चित्र आहे. लिस्बनच्या महापौरांनी राष्ट्रपतींना काल की ऑफ ऑनर देऊन त्यांचा सत्कार केला. राष्ट्रपती मुर्मू आज लिस्बन इथं भारतीय समुदायाला संबोधित करणार आहेत, तसंच त्या पोर्तुगालचे पंतप्रधान आणि पोर्तुगीज संसदेच्या सभापतींचीही भेट घेणार आहेत. उद्या आणि परवा म्हणजे ९ आणि १० तारखेला त्या स्लोव्हाकियाच्या दौऱ्यावर जाणार आहेत. भारताच्या राष्ट्रपतींनी स्लोव्हाकियाला भेट देण्याची गेल्या २९ वर्षातील ही पहिलीच वेळ आहे.

<u>मुद्रा योजना</u>

**प्रधानमंत्री मुद्रा योजनेला १० वर्ष पूर्ण होत आहेत. या योजनेअंतर्गत आतापर्यंत ३२ लाख कोटी रुपयांची ५२ कोटींहून अधिक कर्जं वितरित करण्यात आली आहेत. आर्थिक समावेशन आणि उद्योजकांच्या सक्षमीकरणासाठी सूक्ष्म आणि लघु उद्योजकांना १० लाखांपर्यंतचं तारणमुक्त कर्ज उपलब्ध करून देण्याच्या उद्देशानं पंतप्रधान मोदींनी २०१५ मध्ये ही योजना सुरू केली होती. मुद्रा योजनेच्या दशक पूर्तीनिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी या योजनेच्या लाभार्थ्यांशी संवाद साधणार असून सकाळी ९ वाजता हा कार्यक्रम प्रसारित केला जाणार आहे.**

**<u>शाहसीमापाहणी</u>**

**देशाच्या सीमांच्या रक्षणासाठी सरकार इलेक्ट्रॉनिक टेहळणी प्रणाली बसवत असून दहशदवाद्यांकडून जमिनीखाली खणलेल्या भुयारांमधून होणारे घुसखोरीचे प्रयत्न हाणून पाडण्याकरिता अशा भुयारांचा शोध घेण्यासाठी आणि असे मार्ग उध्वस्त करण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येईल अशी घोषणा केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी काल केली. शहा यांनी काल जम्मू-काश्मीरच्या कठुआ भागातील सीमा सुरक्षेची पाहणी केली, त्यावेळी त्यांनी ही घोषणा केली. यावेळी अमित शहा यांमी सीमा सुरक्षा दलाच्या तुकड्या आव्हानात्मक परिस्थितही चोखपणे आपलं कर्तव्य बजावत असल्याबद्दल त्यांचं कौतुक केलं.**

**<u>सीतारामनदौरा</u>**

**केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन आजपासून सहा दिवस इंग्लंड आणि ऑस्ट्रियाच्या दौऱ्यावर आहेत. या दौऱ्यासाठी त्या काल रात्री लंडन इथं पोहोचल्या. भारताचे इंग्लंडमधील उच्चायुक्त विक्रम दोरायस्वामी यांनी त्यांचं हिथ्रो विमानतळावर स्वागत केलं. आज त्या भारतीय उच्चायुक्तालयानं लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्सच्या सहकार्यानं आयोजित केलेल्या वार्तालाप सत्रात सहभागी होऊन या दौऱ्याचा प्रारंभ करतील. त्यानंतर उद्या त्या त्यांच्या ब्रिटिश समपदस्थ चॅन्सेलर रॅचेल रीव्ह यांच्यामवेत भारत-युके आर्थिक -वित्तीय संवादाच्या १३ व्या मंत्रीस्तरीय फेरीत सहभागी होतील.**

**<u>दुबईयुवराज</u>**

**दुबईचे युवराज, संयुक्त अरब अमिरातींचे उपपंतप्रधान तथा संरक्षणमंत्री शेख हमदान बिन मोहम्मद अल मक्तुम दोन दिवसांच्या भारत भेटीसाठी आज नवी दिल्ली इथं येणार आहेत. दुबईचे युवराज या नात्यानं हा त्यांचा पहिलाच भारत दौरा असेल. पंतप्रधान नरेंद्र मोदी आज दुपारी त्यांच्यासमवेत बैठकीसह भोजन घेणार असल्याचं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाच्या निवेदनात म्हटलं आहे. भारत भेटीवर असलेल्या या मान्यवरांची परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉक्टर एस. जयशंकर आणि संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्यासोबतही बैठक होणार आहे. त्यानंतर संध्याकाळी दुबईचे युवराज मुंबईला रवाना होतील. मुंबईत ते दोन्ही देशांतील अग्रणी व्यावसायिकांसोबत गोलमेज बैठकीत सहभागी होणार आहेत.**

**<u>अमेरिक-चीन</u>**

**चीनमध्ये आयात होणाऱ्या अमेरिकी उत्पादनांवर लादण्यात आलेलं आयात शुल्क जोवर कमी केलं जात नाही, तोवर अमेरिकेत आयात होणाऱ्या चीनच्या वस्तूंवर ५० टक्के अतिरिक्त शुल्क आकारलं जाईल**

**अशी घोषणा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांनी केली आहे. अमेरिकेच्या व्यापारी भागिदार असलेल्या सर्व देशांच्या उत्पादनांवर किमान १० टक्के कर लादण्यात येईल अशी घोषणा गेल्या बुधवारी ट्रम्प यांनी केली होती. यामध्ये चिनी आयातीवर ३४ टक्के आयात शुल्क लादण्यात आलं आहे. दरम्यान, चीनमध्ये उत्पादित मालावर आयात शुल्काची वाढ करण्यावर चीनी प्रशासनानं तीव्र शब्दांत टीका केली आहे.**

**रशियन सरकारचे प्रवक्ते दिमित्री पेस्कोव्ह यांनीही या भरमसाठ आयात करआकारणीनं जागतिक आर्थिक स्थैर्याला सुरुंग लावल्याचा आरोप करत अमेरिकेवर टीका केली आहे. यामुळे सध्या उद्‌भवलेल्या अस्थिरतेच्या परिस्थितीवर रशिया बारकाईनं लक्ष ठेवून असल्याचं पेस्कोव्ह यांनी काल पत्रकार परिषदेत सांगितलं.**

**ब्रिटनचे पंतप्रधान किअर स्टारमर यांनीही अमेरिकेनं केलेली आयात शुल्कवाढ ही जागतिक व्यापार आणि ब्रिटनच्या औद्‌योगिक क्षेत्राला धोका असल्याचं म्हटलं आहे.**
**तर बांग्लादेशच्या अंतरिम सरकारचे मुख्य सल्लागार मोहम्मद युनुस यांनी बांग्लादेशी उत्पादनांवर लादलेली आयात शुल्कवाढ तीन महिन्यांनी लांबवावी अशी विनंती करणारं पत्र अमेरिकी राष्ट्राध्यक्ष ट्रंप यांना लिहीलं आहे.**

**<u>शेअरपूलमाधुरी</u>**
**तत्पूर्वी काल अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी जाहीर केलेल्या आयात शुल्क धोरणाचे गंभीर परिणाम जगभरातल्या विविध देशांसह आशियाई शेअर बाजारातही दिसून आले. भारतीय शेअर बाजारात काल आठवड्याच्या सुरुवातीलाच तीव्र घसरण पाहायला मिळाली. दिवसभराच्या चढ उतारानंतर दिवस अखेर मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक 2 हजार 227 अंकांनी घसरून 73 हजार 138 अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराच्या निफ्टीमध्ये 743 अंकांची घट होऊन बाजार 22 हजार 162 अंकांवर स्थिरावला.**

**<u>पियुष-गोयल</u>**
**भविष्यात सुयोग्य व्यापारी धोरणं आणि व्यापारासंदर्भातील समान संधींची उपलब्धता असणाऱ्या देशांबरोबर भारत भागीदारी करेल असं प्रतिपादन वाणिज्य आणि उद्‌योगमंत्री पियुष गोयल यांनी केलं आहे. मुंबईत सुरु असलेल्या इंडिया ग्लोबल फोरम परिषदेला संबोधित करताना ते काल बोलत होते.**

**<u>तहव्वूरराणा</u>**
**२००८मध्ये मुंबईवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यातील आरोपी तहव्वूर राणा याचा; भारतात प्रत्यापर्णास स्थगिती देण्याची मागणी करणारा अर्ज अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयानं फेटाळला आहे. त्यामुळे राणाच्या प्रत्यापर्णाचा मार्ग मोकळा झाला आहे. तहव्वूर राणा पाकिस्तानी वंशाचा कॅनेडियन नागरिक असून सध्या तो लॉस एंजेलिस येथील डिटेन्शन सेंटरमध्ये आहे. त्यानं २७ फेब्रुवारीला प्रत्यार्पणास स्थगिती मिळावी यासाठी अर्ज केला होता. भारत आणि अमेरिका यांच्यात १९९७ मध्ये झालेल्या प्रत्यार्पण करारानुसार त्याला भारताच्या ताब्यात दिलं जाणार आहे.**

**<u>नक्षली</u>**

**छत्तीसगढमधील दंतेवाडा आणि नारायणपूर जिल्ह्यात काल ३१ नक्षलवाद्यांनी पोलीस अधिक्षक गौरव पाल यांच्यासमोर आत्मसमर्पण केलं. यापैकी तिघांवर साडेचार लाख रुपयांचा इनाम आहे. शरणागती पत्करलेल्या नक्षलवाद्यांमध्ये नारायणपूर जिल्ह्यातील प्रत्येकी एक लाख रुपयाचा इनाम असलेल्या पाच महिला नक्षलींचाही समावेश आहे.**

**<u>IPL</u>**

**आयपीएल क्रिकेट स्पर्धेत काल मुंबईत झालेल्या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बेंगलोर संघानं मुंबई इंडियन्स संघावर १२ धावांनी विजय मिळवला. मुंबई इंडियन्सनी नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला RCB नं दिलेल्या २२२ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना मुंबई इंडियन्स संघ २० षटकांत ९ गडी बाद २०९ धावाच करू शकला.**

**<u>हवामान</u>**

**राजस्थान, सौराष्ट्र आणि कच्छच्या काही भागात आज उष्णतेची लाट येण्याची शक्यता असून भारतीय हवामान विभागानं या भागाला अतिदक्षतेचा इशारा दिला आहे. विदर्भ, पूर्व आणि पश्चिम मध्य प्रदेशासह गुजरात आणि उत्तरेकडील काही राज्यांमध्येही पुढील २ ते ३ दिवस उष्णतेच्या लाटेची स्थिती निर्माण होण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.**

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.